MHPU090046432021

दाखल दिनांक २४/०३/२०२१
दाखल दिनांक २४/०३/२०२१
निकाल दिनांक १३/०१/२०२६
कालावधी वर्ष महिने दिवस
०४ ०९ २०

# प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पिंपरी यांच्या न्यायालयात

**{पिठासीन अधिकारी श्री.व्ही.एन. गायकवाड}**

**नियमित फौ.ख.क्र. ३२३/२०२१**
**CNR.NO.MHPU090046432021**
**गु.क्र.३५४/२०२०**
**चिंचवड पोलीस स्टेशन**
**निशाणी क्र. - ३१**

## भाग 'अ'

| | |
|---|---|
| तक्रारदार | महाराष्ट्र शासन मार्फत<br>तपासी अधिकारी<br>चिंचवड पोलीस स्टेशन |
| अभियोगपक्षातर्फे वकील | श्रीमती. पी.आर.पिसाळ |
| आरोपी | **१.आदेश काशिनाथ भोसले**<br>वयः २६ वर्षे, व्यवसायःव्यवसाय ,<br>रा. पानसरे चौक, आनंदनगर झोपडपटटी चिंचवड, पुणे.<br>**२अनिकेत संतोष भोसले**<br>वयः २२ वर्षे, व्यवसायःव्यवसाय ,<br>रा. पानसरे चौक, आनंदनगर झोपडपटटी चिंचवड, पुणे. |
| आरोपीतर्फे वकील | श्री.के.जी वाघमारे |

## भाग 'ब'

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २९/१२/२०२० |
| प्रथमखबरेची तारीख | ३०/१२/२०२० |
| दोषारोपाची तारीख | २४/०३/२०२१ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | २३/०७/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०४/०८/२०२५ |
| निकालाला ठेवल्याची तारीख | १३/०१/२०२६ |

| | |
|---|---|
| निकालाची तारीख | १३/०१/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, असेल तर | -- |

## आरोपींची माहिती

| अ.क्र. | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामिनावर सोडल्याची तारीख | गुन्हा दाखल असलेले कलम | आरोपी दोषी किंवा निर्दोष | लादलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ नुसार खटल्याच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **आदेश काशिनाथ भोसले** | | | भा.दं.वि.कलम ३९४,५०४सह कलम ३४ | निर्दोष | -- | -- |
| २ | **अनिकेत संतोष भोसले** | | | | | | |

## भाग 'क'

## अभियोगपक्ष/ बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. अभियोगपक्षाचे साक्षीदार

| अ.क. | साक्षीदाराचे नांव | निशाणी | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | महेश गोरोबा कांबळे | नि.क्रं २१ | फिर्यादी |
| २. | नंदकुमार प्रकाश कदम | नि.क्र २७ | साक्षीदार |

### ब . बचावपक्ष साक्षीदार, असेल तर

| **अ.क.** | **साक्षीदाराचे नांव** | **निशाणी** | **साक्षीदाराचा प्रकार** |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

### ब . न्यायालयीन साक्षीदार, असेल तर

| **अ.क.** | **साक्षीदाराचे नांव** | **निशाणी** | **साक्षीदाराचा प्रकार** |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

## अभियोगपक्ष/ बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी यादी

| अ.क. | निशाणी प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | फिर्यादी जबाब केवळ सहीस | नि. क्र. अप-२२ /अभियोगपक्ष साक्षीदार क्र. १ |
| २ | घटनास्थळ पंचनामा | नि.क्र २८ |
| ३ | वैदयकिय प्रमाणपत्र | नि.क्र २९ |

**मंजूर कागदपत्र फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९४ नुसार**

| अ.क. | निशाणी प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|

**ब . बचावपक्ष**

| **अ.क.** | **नांव** | **निशाणी** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क. न्यायालयीन निशाणी**

| **अ.क.** | **नांव** | **निशाणी** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ब . हरकती**

| **अ.क.** | **नांव** | **निशाणी** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**न्या य नि र्ण य**

( घोषित १३ जानेवारी २०२६ )

प्रस्तुत आरोपी भारतीय दंड सहिंताचे कलम ३९४,५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हयाच्या आरोपाखाली खटल्यास सामोरे जात आहेत.

२. **अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

दि. २९/१२/२०२० रोजी आरोपी क्रं १ यांचे घराजवळ आनंदनगर झोपडपटटी चिंचवड पुणे येथे फिर्यादी कामावरुन घरी जात असताना आरोपी क्र १ यांनी फिर्यादी याला घरासमोर आडवुन पैशाची मागणी केली. फिर्यादी यांनी त्यास नकार दिला म्हणुन आरोपी यांनी त्यास शिवीगाळ केली व आरोपी क्रं २ यांनी फिर्यादीच्या डोक्यात लोखंडी रॉडने मारुन जखमी केले व फिर्यादीच्या खिशातुन रु.८००/- काढुन घेतले. त्यानंतर फिर्यादीने चिंचवड पोलीस ठाणेत आरोपींविरुध्द तक्रार दिली.

३. त्यानुसार आरोपींविरुध्द भारतीय दंड सहिता कलम ३९४,५०४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा नोंदविणेत आला. सदरचा तपास पो.उपनिरिक्षिक एन.पी. कदम पो. स्टेशन यांनी केला. तपासकामी त्यांनी घटनास्थळ पंचनामा करुन साक्षीदारांचे जबाब नोंदवले आणि तपासाअंती आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

**४.** सदर प्रकरणी आरोपी हजर झाले असता मी त्यांना गुन्ह्याचा तपशील मराठीमध्ये वाचून व समजावून सांगितला आणि त्यांचेविरुध्द भारतीय दंड सहिता कलम ३९४,५०४ सह कलम ३४ प्रमाणे अन्वये दोषारोप नि.क्रं १४ निश्चित करण्यांत आला. आरोपींनी गुन्हा अमान्य करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची समर्थता दर्शविली.

**५.** अभियोगपक्षातर्फे घेणेत आलेल्या साक्षीदारांच्या जबाबाचे अवलोकन केले असता आरोपींविरुध्द पुरावा आल्यामुळे आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब नि.क्र वर ३० नोंदविणेत आला.

**६.** अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.आर.पिसाळ व आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.के.जी वाघमारे यांचा युक्तीवाद ऐकला. फिर्यादीने केलेले कथन, आरोपीने घेतलेला बचाव, अभिलेखावर आलेला पुरावा या सर्व परिस्थितीचा सारासार विचार केला असता, खालील बाबी विचाराधीन उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे.

| अ.क्रं. | विचाराधीन बाबी | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो का आरोपींनी आप-आपसात संगनमत करुन आरोपी यांनी दरोडा घालत असताना फिर्यादी यांना जाणुबन बुजुन दुखापत केली आणि त्याव्दारे भारतीय दंड संहिताचे कलम ३९४ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला हे ? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने असे शाबीत केले आहे काय की, आरोपींनी आपआपसांत संगनमत करून फिर्यादी यांना वाईट शिवीगाळ करुन प्रक्षोभित करण्यासाठी अपमानास्पद वागणूक दिली, ज्यामुळे फिर्यादी व साक्षीदारांकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल किंवा कोणता अपराध होईल या हेतूने शिवीगाळ करुन प्रक्षोभिताची कारवाई केली आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | नाही. |
| ३. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता |

## कारण मिमांसा

**७.** अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द गुन्ह्याच्या शाबितीकरिता फिर्यादी यांची साक्ष नि. २१ वर तपासी अधिकारी नंदकुमार प्रकाश कदम यांची साक्ष नि.क्रं २७ वर नोंदविली आहे. त्यानंतर अभियोगपक्षाच्या तोंडी विनंतीवरुन नि.क्रं १ वर पुरावा बंद केला.

**<u>मुद्दा क्र.१ व २ करीता</u> :**

**८.** सर्व मुद्दे हे एकाच वेळी एकाच ठिकाणी घडलेल्या घटनेशी निगडीत असल्याने कारणांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी व योग्य निर्णयाप्रत पोहोचण्यासाठी मी सर्व मुद्दे हे एकत्रित चर्चित आहे.

**९.** अभियोग पक्षाने फिर्यादी यांना नि.क्र २१ वर तपासलेले आहे. साक्षीदार पुढे कथन करतो की, घटना दि. २९/१२/२०२० रोजी दुपारी ३.३० वाजता ते घरी जात असताना ते पाय घसरुन पडले त्यावेळेस कडेला उभे असलेले आरोपी हे त्यांचकडे पाहुन हसले. त्यावेळी आरोपी व त्यांच्यामध्ये काही शाब्दीक वाद झालेला होता, या वादाच्या रागातून व गैरसमजातून आरोपीविरुद्ध फिर्यादी दिली असल्याचे मान्य केलेले आहे. या व्यतिरिक्त काही घडले नसल्याचे साक्षीदार यांनी मान्य केलेले आहे. तसेच सदर जप्त मुददेमाल लोखंडी रॉडने त्यांना आरोपीने कधीही मारले नव्हते.

**१०.** अभियोगपक्षा तर्फे तपासी अधिकारी नंदकुमार कदम यांना नि.क्रं २७ वर तपासले आहे. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास पुरक अशी साक्ष दिलेली आहे. त्यामुळे त्यांनी फिर्यादीच्या जबाबास पुरक अशी साक्ष दिलेली आहे.

**११.** मी अभियोगपक्षाच्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले. सदर खटल्याकामी अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी यांनी अभियोगपक्षास साहाय्य केलेले नाही. या प्रकरणातील साक्षीदार क्र.१ हे फिर्यादी असून घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तसेच, पिडित व्यक्ती आहेत. सदर साक्षीदाराने आरोपी विरुध्द काही सांगितलेले

नाही. तसेच सदर साक्षीदाराने जप्त मुददेमाल लोखंडी रॉडने त्यांना आरोपीने मारहाण केली नसल्याचे सांगितले आहे. सदर साक्षीदाराने घटनेबाबतचे सर्व मजकूर हा नाकारलेला असून घटनेदिवशी आरोपी व त्यांच्यात मिळकतीवरुन शाब्दीक वाद झाले व या वादाच्या रागातुन पोलीस स्टेशनला तक्रार दिली, या व्यतिरिक्त काहीही घडले नव्हते असे कथन केले आहे. फिर्यादी यांना मुळ फिर्यादी जबाब दाखवला असता, त्यावरील सही त्यांनी मान्य केली आहे. तथापि, त्यातील मजकुर माहित नाही असे कथन केले आहे. त्यामुळे, मुळ फिर्याद हि शाबीत झालेली नाही. त्याचा प्रतिकुल परिणाम अभियोगपक्षाच्या पुराव्यावर होत आहे.

**१२.** जरी आरोपी यांनी घटनास्थळ व वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य केले असले तरी, आरोपीविरुद्ध ठेवलेले दोषारोप सिद्ध करण्याकरिता पटलावर सबळ पुरावा आणण्यास अभियोग पक्ष संपूर्णतः असफल झालेला आहे.

**१३.** अभियोगपक्षाचे साक्षीदार क्र. १ यांनी साक्ष फिरविल्यामुळे अभियोगपक्षाच्या विनंतीवरुन सदर साक्षीदारास उलट प्रश्न विचारण्याची संधी देण्यात आली. साक्षीदार यांच्या उलट तपासणीमध्ये देखील आरोपींनी गुन्हा केला याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब, सदर साक्षीदार यांच्या साक्षीवरुन आरोपींनी गुन्हा केला आहे, हे शाबीत होत नाही.

**१४.** सबब, अभियोगपक्षाचे एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपी क्र १ यांनी फिर्यादी याला घरासमोर आडवुन पैशाची मागणी केली. फिर्यादी यांनी त्यास नकार दिला म्हणुन आरोपी यांनी त्यास शिवीगाळ केली व आरोपी क्रं २ यांनी फिर्यादीच्या डोक्यात लोखंडी रॉडने मारुन जखमी केले हे निःसंशय शाबीत होत नाही. करीता, मी मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष नकारात्मक देत आहे.

**१५.** खोटी फिर्याद किंवा खोटी साक्ष देणे हा कायदयाने गुन्हा आहे. फिर्यादीने तिच्या पुर्वीच्या जबाबाशी विसंगत साक्ष दिल्याचे दिसुन येते. फिर्यादी मधील मजकुर फिर्यादीने जरी नाकारला असला तरी त्यावरील सही त्यांनी त्यांची असल्याचे कबुल केले आहे. फिर्यादी त्यांच्या पुर्वीच्या जबाबाशी विसंगत साक्ष दिल्याचे दिसुन येते. करिता त्यांचेविरुध्द खोटी तक्रार व साक्ष देण्याकरिता खटला भरवावा असे न्यायालयाला वाटत नाही.

**<u>मुद्दा क्र.३ करीता</u> :**

**१६.** फौजदारी खटल्यात आरोपींवर ठेवण्यात आलेले दोषारोप हे निःसंशय शाबीत करण्याची जबाबदारी अभियोगपक्षावर आहे. वर चर्चिलेप्रमाणे, अभियोगपक्ष हे आरोपींवर ठेवण्यात आलेले आरोप संशयापलीकडे जाउन शाबीत करण्यात असफल ठरले आहे. त्यामुळे, आरोपींना निर्दोष मुक्त करणे क्रमप्राप्त ठरते. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे :

## <u>आ दे श</u>

१. आरोपी क्रं १ **आदेश काशिनाथ भोसले**, आरोपी क्रं २ **अनिकेत संतोष भोसले** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड सहिता कलम ३९४,५०४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यांत येते.
२. आरोपींचा जामीन कदबा व जातमुचलका रदद करण्यात येतात.
३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७अ अन्वये जामीना संबधी पुर्तता करावी.

VIJAYSINH NARAYAN GAIKWAD
Digitally signed by VIJAYSINH NARAYAN GAIKWAD
Date: 2026.01.16 16:55:00 +0530

ठिकाणः पिंपरी (व्ही. एन. गायकवाड )
दिनांकः १३/०१/२०२६ ८ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पिंपरी

**CERTIFICATE**

I affirm that the contents of PDF file Judgment are same word for word as per original Judgment.

Name of Stenographer : V. G. Fulari (Steno)

Court name : Shri. V. N. Gaikwad
8th CJJD & JMFC, Pimpri.
Judgment/Order delivered on : 13/01/2026

Judgment/Order signed by P. O. : 16/01/2026

Judgment/Order uploaded on : 16/01/2026